सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शुध्दीपत्रक क्रमांक- एमपीआयडी -०५२५/ प्र. क्र. ८१ / पोल- १५, दि.०५/०८/२०२५.

**विषय** :- महाराष्ट्र ठेवीदारांच्या ( वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अंतर्गत विहीत कालमर्यादेत करावयाच्या कार्यवाहीबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शुध्दीपत्रक क्रमांक- एमपीआयडी -०५२५/ प्र. क्र. ८१ / पोल-१५, दि.०५/०८/२०२५, ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०८०५१७२४४७७०२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 11-08-2025 22:15:51
( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, कायदा व सुव्यवस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, आर्थिक गुन्हे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून).
विशेष पोलीस महानिरीक्षक, कायदा व सुव्यवस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (गुन्हे).
कार्यासन अधिकारी, का क्र.२२/२३.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

(कृ.म.प)

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अंतर्गत विहीत कालमर्यादेत करावयाच्या कार्यवाहीबाबत**

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन शुद्धीपत्रक क्रमांक : एमपीआयडी-०५२५/प्र.क्र.८१/पोल-१५**

दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: ०५ ऑगस्ट, २०२५

**वाचा:** गृह विभाग, शासन परिपत्रक क्र.एमपीआय १११९/प्र.क्र.०९/पोल-११, दिनांक २५.०२.२०१९

**शुद्धीपत्रक**

महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये ठेवीदारांची फसवणूक केल्याप्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात येतो. सदर दाखल गुन्ह्यांतील पिडीतांना, उक्त कायद्यातील तरतूदीनुसार, त्यांच्या ठेवी परत करण्याच्या दृष्टिने करावयाच्या कालबध्द कार्यवाहीमध्ये सुसुत्रता आणण्याच्या अनुषंगाने सविस्तर सूचना संदर्भाधीन दिनांक २५.०२.२०१९ च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ या कायद्यानुसार संबंधीत वित्तीय संस्थेच्या मालमत्ता जप्त करण्याकरिता शासन अधिसूचना निर्गमित करणे आवश्यक आहे. सदर शासन अधिसूचना निर्गमित करण्याकरिता शासनास कशा प्रकारे प्रस्ताव सादर करावेत याबाबत सदर परिपत्रकामधील मुद्दा क्रमांक (३) व (४) अन्वये कार्यपद्धती निश्चित केली आहे. तथापि, सदर कार्यपद्धतीचे पालन करताना, जिल्हाधिकारी आणि प्रकरणपरत्वे अपर पोलीस महासंचालक (आ.गु.शा.), म.रा., मुंबई किंवा सह पोलीस आयुक्त (आर्थिक गुन्हे शाखा) / सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) बृहन्मुंबई यांच्याकडून विहीत कालमर्यादेत प्रस्ताव शासनास प्राप्त होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच, काही प्रकरणांमध्ये जिल्हाधिकारी किंवा आर्थिक गुन्हे शाखा यांच्यापैकी एका कार्यालयाचा प्रस्ताव शासनास प्राप्त होतो परंतु दुस-या कार्यालयाकडून शासनास प्रस्ताव प्राप्त होण्यास बराच कालावधी जातो. दोन्ही घटकांकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्याची शासन स्तरावर छाननी करताना, काही त्रुटी निदर्शनास आल्यास त्या त्रुटींची संबंधित घटकांकडून पूर्तता होईपर्यंत बराच कालापव्यय होतो, असे निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये अधिसूचना निर्गमित करण्यास विलंब झाल्याने अनेक न्यायालयीन प्रकरणे उद्भवली असून मा. न्यायालयाने ब-याच प्रकरणांमध्ये नाराजी व्यक्त केली आहे. गृह विभाग शासन परिपत्रक दि.२५.०२.२०१९ मधील सूचना क्रमांक (३) व (४) अन्वये, जिल्हाधिकारी आणि प्रकरणपरत्वे अपर पोलीस महासंचालक (आ.गु.शा.), म.रा., मुंबई (बृहन्मुंबई वगळून) किंवा सह पोलीस आयुक्त (आर्थिक गुन्हे शाखा)/सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) (बृहन्मुंबईकरिता) यांच्याकडून परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्याशिवाय शासन आदेश निर्गमित करता येत नाहीत. यामुळे शासन स्तरावर ही प्रकरणे प्रलंबित राहतात व पिडीतांना न्याय मिळण्यास विलंब होतो. यास्तव या प्रकरणांमध्ये होणारा कालापव्यय टाळण्याकरिता संदर्भाधिन शासन परिपत्रकातील शासनास प्रस्ताव सादर करावयाच्या कार्यपद्धतीबाबतच्या सूचना क्रमांक (३) व (४) मध्ये बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन शुद्धीपत्रक :**

महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अंतर्गत विहीत कालमर्यादेत करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने निर्गमित केलेल्या गृह विभाग, शासन परिपत्रक क्र.एमपीआय १११९/प्र.क्र.०९/पोल-११, दिनांक २५.०२.२०१९ मधील सूचना क्रमांक (३) व (४) रद्द करण्यात येत असून त्याऐवजी खालील सूचना समाविष्ट करण्यात येत आहेत :

(३) महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ च्या कलम ४(१) अन्वये शासन अधिसूचनेसाठी आवश्यक प्रस्ताव प्रथमत: संबंधित पोलीस अधीक्षक / पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून) यांनी सोबत जोडलेल्या "परिशिष्ट २" (शासन परिपत्रक दि.२५.०२.२०१९ सोबतचे) प्रमाणे पूर्तता करुन संबंधित जिल्हाधिकारी यांना सादर करावेत. तर बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रस्ताव "परिशिष्ट २" (शासन परिपत्रक दि.२५.०२.२०१९ सोबतचे) प्रमाणे पूर्तता करुन प्रकरणपरत्वे सह पोलीस आयुक्त (आर्थिक गुन्हे शाखा) व सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) यांनी संबंधित जिल्हाधिकारी यांना सादर करावेत.

जिल्हाधिकारी यांनी सदर प्रस्तावांची छाननी/तपासणी करुन संबंधित प्रकरणी नियुक्त करावयाच्या सक्षम प्राधिका-याच्या तपशिलासह आणि समर्थनीय शिफारशींसह १० कार्यालयीन दिवसांत ते प्रकरण संबंधित पोलीस अधीक्षक / पोलीस आयुक्त यांना आणि बृहन्मुंबईकरिता सह पोलीस आयुक्त (आर्थिक गुन्हे शाखा) / सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) यांना परत करावे. सदर प्रकरणांमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शिफारशींसह प्रस्ताव प्राप्त करून घेण्याची जबाबदारी संबंधीत गुन्ह्याच्या तपासी अधिकाऱ्याची राहील.

(४) जिल्हाधिकारी यांच्या शिफारशींसह प्राप्त झालेला प्रस्ताव संबंधित पोलीस अधीक्षक / पोलीस आयुक्त यांनी अपर पोलीस महासंचालक (आ.गु.शा.), म.रा., मुंबई (बृहन्मुंबई वगळून) यांना सादर करावा.

जिल्हाधिकारी यांच्या शिफारशींसह प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी / तपासणी करून अपर पोलीस महासंचालक (आ.गु.शा.), म.रा., मुंबई यांनी आणि बृहन्मुंबईकरिता जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शिफारशीसह प्राप्त प्रस्ताव सह पोलीस आयुक्त (आर्थिक गुन्हे शाखा) / सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) यांनी १० कार्यालयीन दिवसांत शासनास सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२५०८०५१७२४४७७०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

YAMUNA DHANANJAY JADHAV

Digitally signed by YAMUNA DHANANJAY JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=2C3DF382DDA9F94D60DC0EA9D4827D801C6EDC144E58FFD58ED3EF2FE7FB16A5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F6CCE4E8E68DFB65BCD1BA4CE35CF82E2B05A7DDC3056B9285E5C75F146B1EEA, cn=YAMUNA DHANANJAY JADHAV
Date: 2025.08.05 17:25:45 +05'30'

**( यमुना जाधव )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री, गृह (शहरे), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय,मुंबई.
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. पोलीस आयुक्त, मुंबई.
९. अपर पोलीस महासंचालक (आर्थिक गुन्हे शाखा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०.अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे.
११.सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
१२.सह पोलीस आयुक्त (आर्थिक गुन्हे शाखा), बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय, मुंबई.
१३.सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था), बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय, मुंबई.
१४.सर्व विभागीय आयुक्त, महसूल.
१५.सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी.
१६.सर्व पोलीस आयुक्त/सर्व पोलीस अधीक्षक.
१७.अधिक्षक, मा. उच्च न्यायालये/एमपीआयडी न्यायालये.
१८. सर्व सक्षम प्राधिकारी (एमपीआयडी).
१९. अवर सचिव/कक्ष अधिकारी(पोल-११, पोल-१२, पोल-१३)
२०.निवडनस्ती, कार्यासन (पोल १५).